"सातारा जिल्हयातील नियमित कृषी विषयक बाजारपेठेचा भौगोलिक अभ्यास"

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या
सामाजिक शास्त्र विद्याशाखेअंतर्गत भूगोल विषयातील
पीएच. डी. पदवीसाठीच्या शोध प्रबंधाचा प्राथमिक सारांश
आराखडा

संशोधक

प्रा. मनोजा भास्कर सोनार

भूगोल विभाग,

रयत शिक्षण संस्थेचे कला व वाणिज्य महाविद्यालय,

पुसेगांव, ता. खटाव, जि. सातारा (महाराष्ट्र)

मार्गदर्शक

प्रा. डॉ. बस्वराज नागलगावे

भूगोल विभाग,

पं. दिनदयाल उपाध्याय महाविद्यालय,

देवणी, जि. लातूर (महाराष्ट्र)

ऑगस्ट २०१७

"सातारा जिल्हयातील नियमित कृषी विषयक बाजारपेठेचा भौगोलिक अभ्यास"

प्रस्तावना :-

मानवाच्या मुलभूत गरजा, त्यांच्याशी संबंधित व्यापार व दळणवळणाचाही अभ्यास भुगोल विषयात केला जातो. व्यापार व दळणवळणाचा विकास झाला तर व्यक्तींचा आणि त्या प्रदेशाचा सुध्दा विकास होतो. भारतीय अर्थव्यवस्थेत शेती व्यवसायाला अत्यंत महत्वाचे स्थान प्राप्त झालेआहे. भारतात शेती व्यवसाय म्हणजे भारतीय अर्थव्यवस्थेचा कणाच समजला जातो. गेल्या शतकात उदयोगीकरण करण्याचे प्रयत्न केले गेले असले तरी भारतातील शेती व्यवसायाचे स्थान अदयाप महत्वाचेराहिले आहे. भारतातील बहुसंख्य लोकांच्या उपजिविकेचे शेती हे एक प्रमुख साधन आहे. भारतातील बहुसंख्य लोकांच्या उपजिविकेचे शेती हे एक प्रमुख साधन आहे. भारतातील दर दहा लोकांपैकी सात लोक आपल्या चरितार्थासाठी शेती व्यवसायावर अवलबुन आहेत.

व्यापार हा मानवी जीवनाचा अविभाज्य भाग आहे. प्राथमिक अवस्थेपासुन मानव वस्तुंची देवाण घेवाण करीत आहे. मालाची देवाण घेवाण, खरेदी विक्रि करणे, उत्पादित माल बाजारपेठेपर्यंत पोहोचविणे इत्यादी व्यापारी क्रिया मानव प्राचीन काळापासुन करीत आला आहे. व्यापार क्रिया, देवाण घेवाण व बाजारपेठे इत्यादीवर निसर्गाचा प्रभाव पडतो. नैसर्गिक घटक व व्यापारी क्रियायांच्यातील परस्पर संबंध किंवा आंतरक्रियांचा अभ्यास भुगोलामध्ये केला जातो. व्यापारी भुगोल ही एक भुगोलाची महत्वाची शाखा असुन यामध्ये व्यापारी क्रिया, बाजार इत्यादी संबंधी नवनवीन बाबींचा अभ्यास केला जातो. तसेच व्यापारी भुगोलामध्ये व्यापार आर्थिक क्रिया यांचा भौगोलिक घटकांशी असलेला संबंध यांचा अभ्यास केला जातो.

शेती माल उत्पादीत करणे, उत्पादीत मालाचा शोध घेणे, उत्पादित माल बाजारपेठांपर्यंत पोहोचविणे, शेती प्रदेशातील भौगोलिक परिस्थितीला अनुसरुन उत्पादीत केलेला माला स्थानिक व इतर बाजारपेठांमध्ये उपलब्ध करणे, एका प्रदेशातील माल दुसऱ्या प्रदेशामध्ये पाठविणे इत्यादी व्यापररी किंवा आर्थिक क्रियांची ध्येये आहेत. मानवी व्यवसाय किंवा व्यापारप्रणाली ही प्राचीन काळापासुन अस्तित्वात आहे. ही संकल्पना आधुनिक शास्त्रीय आहे. खरी व्यापारप्रणाली ज्याला आंतरराष्ट्रीय महत्व आहे, ही दुसऱ्या महायुध्दानंतर विकसित झाली. व्यापाराची सुरुवात ही प्रथम जमिनीवरुनझाली. नतंर त्याचे रुपांतर आधुनिक काळात आंतरराष्ट्रीय व्यापार प्रणाली विकसित झाली.

बाजार केंद्र हे मानव आणि मानवाच्या आर्थिक गरजा यांच्यातील क्रिया आणि प्रक्रियांचा साक्षात उतरता व चढता आलेख असतो म्हणुन भुगोलात बाजारकेंद्रांचा अभ्यास केला जातो. मानवी समुदाय

गटांमध्ये स्थिर झाला व या मानवाच्या प्राथमिक, सामाजिक, आर्थिक आणि सांस्कृतिक गरजा या स्थिरतेतून म्हणजेच बाजारकेंद्राच्या माध्मातुन पुर्ण होऊ लागल्या. बाजारकेंद्र निर्मितीसाठी अनुकूल नसतात. काही प्रदेश अनुकूल तर काही प्रदेश प्रतिकुल असतात. (मॅक कॉर्टी व लिंडबर्ग) यांच्या मते व्यापारी क्रियांचा भौगोलिक अभ्यास व्यापारी भुगोलात केला जातो. ज्यांचा संबंध बाजारकेंद्रातील घाऊक व किरकोळ व्यवसाय त्यांच्या विक्री, सोयी सुविधा, बाजारप्रदेश, व्यापारी संस्थाने यासारख्या इतर तत्वांशी आहे. (श्रीवास्तव, आर.सी. आणि गुप्ता, जे. पी, १९७९)

म्हणजेच व्यापारी भुगोलाचा कणा हा बाजारकेंद्र आहे. बाजार हा शब्द 'Market' या इंग्रजी शब्दाचा अनुवाद आहे. Market ले लॅटीन भाषेतील Matketus पासुन बनले आहे ज्याचा अर्थ असे ठिकाण जिथे विक्रेते व खरेदीकर्ते (ग्राहक एकमेकांना (आर्थिकदृष्टया) भेट देतात बाजारकेंद्रांचे स्थान, भौगोलिक विस्तार, प्रादेशिक वितरण, ग्राहक, विक्रेते तसेच आंतरक्रिया इ. बाबी भुगोल तज्ञांसाठी आवश्यक आहेत.

प्रस्तुत संशोधनामध्ये सातारा जिल्हयातील नियमील कृषी बाजार केंद्राच्या अभिक्षेत्रीय संघटनांचा अभ्यास करण्याचा प्रयत्न केलेला आहे. तसेच व्यापार क्षेत्राचा क्षमता (वस्तु व सेवापुरविण्याची क्षमता), अभिक्षेत्रीय वितरण, वाढ, वर्गवारी केंद्रीयता, स्वीकृत रचना, व्यापार क्षेत्र व सदय अभिक्षेत्रीय संघटन इत्यादींचा तसेच बाजारचक्र, त्याची पूनरर्चना, नवीन सुचविलेले बाजारकेंद्र इत्यादी घटकांचा सखोल अभ्यास करण्यात आलेला आहे. सदरच्या संशोधनात मिळणारी माहिती सातारा जिल्ह्याच्या नियोजन व विकासाला उपयोगी ठरणारी आहे.

बाजारकेंद्राची रचना ही अतिशय गुंतागुंतीची असते. याबाबतचा अभ्यास योजना वनियोजनासाठी अत्यंत उपयुक्त ठरतो. याचा अर्थ त्यामुळे बाजारकेंद्रातील सेवा सुविधा व्यापारी क्रिया व त्याला प्रोत्साहित करणाऱ्या इतर क्रियांचा विकास शक्य आहे. जमिनीचा व्यापारी उपयोग यामध्ये किरकोळ व घाऊक व्यापाऱ्यांनी व्यापलेली जमीन व आर्थिक स्त्रोत पुरविणाऱ्या बँका, विमा, माल साठवण इत्यादींचा समावेश होतो.

बाजारक्षेत्र किंवा बाजारकेंद्राचे व्यापार क्षेत्र हे व्यापारी भुगोलातील महत्वपुर्ण घटक आहे. बाजारकेंद्राने व्यापलेले क्षेत्र म्हणजे व्यापरक्षेत्र, विक्रिक्षेत्र ज्यामध्ये बाजारपेठ ग्राहकांना आकर्षित करण्याची क्षमता कोणत्या क्षेत्रापर्यंत वस्तू विकण्याची क्षमता असणारे प्रदेश होय.

नियमीत बाजार हा बाजारकेंद्राचा महत्वपूर्ण घटक असुन बाजारकेंद्राची कालबध्दता किंवा नियमीतपणा व्यापारी भुगोलमध्ये अभ्यासला जातो.

अध्ययन विषयाचे महत्व

नियमीत कृषी बाजारपेठेचे महत्व एकविसाव्या शतकात महत्वाचे आहे. बाजापेठ य संकल्पनेत

रोज एक नवीन बदल घडत आहे. सामाजिक बदलाचा उदेश लक्षात घेऊन या नियमीत कृषी बाजारपेठ' ही संकल्पना अभ्यासात आहे. बाजारपेठ या प्रामुख्याने शेती व्यवसायाशी निगडीत आहेत. कृषी व्यापार हा ग्रामीण भागातुन शहरी भागाकडे वाढताना दिसतो. बाजारपेठा या प्रामुख्याने शेती मालावर आधारित असतात. पंरतु शहरापासुन बाहेरच्या राज्याकडे माला पाठविण्यासाठी नियमीत कृषी बाजारपेठेंचा उपयोग होतो. सदर बदलाच्या स्वरुपाचा नियमीत कृषी बाजारपेठांवर होणारा परिणामअभ्यासण्यासाठी हा विषय निवडला आहे. सामाजिक व आर्थिक महत्व या संकल्पनेवरच हा अभ्यास आधारलेला आहे.

अध्ययन विषयाची निवड :

नियमीत कृषी बाजारपेठांची रचना ही अतिशय गुंतागुंताची आहे. यासाठी अभ्यास योजना व नियोजनाची गरज भासते. हे नियोजन नियमीत कृषी बाजारपेठेला एक महत्वाचेस्थान निर्माण करुन देते. संपूर्ण भारताची अर्थव्यवस्था ही नियमीत कृषी बाजारपेठांचा अभ्यास करण्यासाठीया विषयाची निवड केली आहे. नियमीत कृषी बाजारपेठेचे स्वरुप, उत्पादीत माल, विक्री माल व आयात निर्यातीतील महत्व अभ्यासण्यासाठी हा विषय महत्वाचा आहे.

अध्ययन विषयाची संकल्पना :

बाजारपेठ (Market) :

कोणत्याही प्रकारच्या व्यापारात बाजारपेठ हा महत्वाचा घटक असतो. बाजारपेठेलाच व्यापार शास्त्रामध्ये विपनन असे म्हणतात. बाजारपेठेत खरेदीदार आणि विक्रेते एकत्र येऊन विनिमय करतात. आधुनिक काळात जलद संदेशवहनाची साधने उपलब्ध असल्याने खरेदीदार विक्रेतेएकत्र न येता खरेदी विक्रि व्यवहार घडु शकतात. या व्यवहारांनाही बाजारपेठ असे म्हणतात. जाहिराती व प्रसारमाध्यमांव्दारे व्यापक भौगोलिक स्थान, उत्पादन क्षेत्र व वस्तुंची मागणी या आधारे बारारपेठांचेमहत्व ठरते. बाजारपेठ ही व्यापारी संकल्पना असली तरी तिला क्षेत्रीय पार्श्वभुमी असते. या पार्श्वभुमीवर मालाचा क्रय विभाग अवलंबुन असतो. (विठल घारापुरे, आर्थिक भुगोल, २००२)

बाजारपेठेची तत्वे :

अ) बाजारपेठांचे व्यापारी व वाणिज्य कार्याच्या दृष्टीने महत्वाचे स्थान असते.

ब) बाजारपेठांचा संबंध विविध भौगोलिक क्षेत्रांशी निगडीत असतो.

क) बाजारपेठांमुळे स्थान उपयोगिता वाढते. तसेच विविध क्षेत्रात संग्रहण, वितरण वहन व हस्तांतर या क्रियांना वेग मिळतो.

ड) लोकसंख्या वाढली म्हणजे बाजारपेठांमध्ये मुलभूत गरजांसाठी लागणारी उत्पादने आपोआपच बाजारपेठांमध्ये महत्वपुर्ण ठरु लागतात.

इ) बाजारपेठांचे प्रकार स्थळ, काळ, व्यवहाराचे प्रमाण, बाजारपेठांवरील नियंत्रण, वस्तुंचे स्वरुप, प्रकार, वस्तु प्रदान करण्याची पध्दत यानुसार ठरतात. उदा.

१) क्षेत्रानुसार : १. स्थानिक बाजारपेठ

२. प्रादेशिक बाजारपेठ

३. राष्ट्रीय बाजारपेठ

४. जागतिक बाजारेपठ

२) काळानुसार : १. अल्पकालीन बाजारपेठ

२. दीर्घकालीन बाजारपेठ

३) व्यवहारानुसार : १. घाऊक बाजारपेठ

२. किरकोळ बाजारपेठ

ग्रामीण व शहरी बाजारपेठा :

व्यापार हा शेवटी लोकांसाठीच आणि लोकांच्या आवडीनिवडी व गरजांनुसार चालतो. ग्रामीण लोकसंख्या व शहरी लेकसंख्या यांच्यात मुलतः फरक आहे. ारतासारख्या देशात तर ही गोष्ट प्रकर्षाने जाणवते. ग्रामीण लोकांच्या गरजा मर्यादित व शहरी लोकांच्या वेगळया असतात. ग्रामीण भागातील लोकांच्या गरजा लक्षात घेऊनच किरकोळ व्यापार ग्रामीण क्षेत्रात विकसित होतो. शहरी बाजापेठ व ग्रामीण बाजारपेठांच्या आकारमानात फरक असतो. ग्रामीण भागात मर्यादित लोकसंख्या असल्याने किरकोळ व्यापार कमी प्रमाणात व ठराविक वस्तुंचाचा चालतो.

शहरी बाजारपेठा मात्र आकाराने मोठया असतात कारण शहराची लोकसंख्या जास्त असते. त्यांच्या गरजाही विविध प्रकारच्या असतात. त्यामुळे जास्तीत जास्त उत्पादने विक्रीसाठी शहरी बाजारपेठांमध्ये येतात. घाऊक व्यापार हे शहरी बाजारपेठेचे तर किरकोळ व्यापार ग्रामीण बाजारपेठेचे वैशिष्टय आहे. शरासभोवतालच्या पार्श्वप्रदेशातील किरकोळ मालाचे व्यापारी खरेदीसाठी मोठ्या बाजारपेठेमध्येच येतात. शहरांची लोकसंख्या जास्त असल्याने त्यांच्या गरजाही विविध प्रकारच्या असतात. या भागविण्यासाठी किरकोळ व्यापारी शहरी बाजारपेठांमध्ये मोठया प्रमाणात कार्यरत असतात. ग्रामीण बाजारपेठ व शहरी बाजारपेठ यांच्यात मुलभूत फरक आहे. याला दोन घटक कारणीभुत असतात. एक लोकसंख्या व दुसरे वितरण क्षेत्र.

कोणत्याही देशाची, प्रदेशाची प्रगती, विकास, समृध्दी संपूर्णपणे उदयोगधदयांच्या, लघुउदयोगाच्या विकासावरच असते व उदयोगामुळे, लघुउदयोगामुळे बाजार केंद्रासाठी मोठ्या प्रमाणावर कच्या मालाचे पकया मालात रुपांतर करण्यासाठी कारखाने, हातमाग, चामडीपासुन विविध वस्तु बनवणे व त्या आडवडी बाजारपेठेत विक्रीस नेण्यासाठी वाहतुक खर्चात बचत करण्यासाठी बाजारकेंद्राजवळच निर्माण केले

जातात. त्यामुळेच या केंद्राच्या विकासास चालना मिळुन आर्थिक कल्याण साधता येते.

नियमीत बाजारपेठा :

अगदी एकविसाव्या शतकाच्या सुरुवातीला भारतीय बाजार बहुंताशी 'मूक्त' स्वरुपाचे निर्माण झाले. शेतकऱ्याचे शेतमाल विक्रिसाठी बाजारात आणल्यानंतर त्या शेतमालाची विक्री शास्त्रनिष्ठ पध्दतीने केली जात नाही. शेतलमालाची विक्री खऱ्या अर्थाने खुल्या बाजारात केली जात असेल तर शेतकऱ्यांच्या हितसंबंधाची जपवणुक केली जात नाही. खुल्या लिलावाच पध्दतीतही त्यांचे हितसंबंध समान असतात. अशा संस्थेचे अल्प असणाऱ्या बोलीदारांमध्ये गुप्त स्वरुपाचा संकेत असु शकतो. हे सर्व दोष दुर करण्यासाठी शेतकरी, दलाल आणि व्यापारी यांच्या प्रतिनिधींची 'बाजार समिती' स्थापन केली जाणे आवश्यक असते.

रॉयल कमिशनच्या (Royal Commission on Agiculture, १९२६) शिफारशीनुसार १९३० च्या काळात भारताता बाजारांचे नियंत्रण करण्यास सुरवात झाली. नियंत्रित बाजाराच्य विकासासाठी मदत करण्याच्या हेतुने भारत सरकारने योजना तयार केल्या. बाजारांचे नियंत्रण करण्यात आलेल्या कायदयांच्या कक्षेत सर्व प्रकारच शेतमाल, तसेच बागायती पिके, पशुसंवर्धन व्यवसायातील वस्तु, दुग्धशाळा व्यवसायात तयार होणाऱ्या वस्तू यांचा समावेश करण्यात आला आहे. प्रत्येक अधिसुचित क्षेत्रासाठी (Hotified Area) ऐक 'बाजार समिती' स्थापन करण्याचा अधिकार प्रत्येक घटक राज्य सरकारला कायदयान्वये देण्यात आला आहे.

अभ्यासक्षेत्रीय अनेक गावांमध्ये विशेषत: कृषीवर आधारित वस्तुंची देवाण घेवाण ग्रामीण स्तरावरती होताना दिसते. या वस्तुची विक्रि शेतकरी वर्गातुन होत असते. अशा वस्तुंचा नमुना दाखवुन त्यांचे मुल्य ठरविले जातात. जर त्या वस्तुचे प्रमाण जास्त असेल तर लिलाव केला जातो आणि लिलावाव्दारे मुल्य ठरविले जाते.

अध्ययन क्षेत्राची निवड :

"सातारा जिल्हयातील नियमित कृषी विषयक बाजारपेठेचा भौगोलिक अभ्यास" या शीर्षकाला अनुसरुन संशोधन पुर्ण केले जाणार आहे. या अभ्यासाकरीता सातारा जिल्ह्याची निवड केली आहे. सातारा जिल्हा हा महाराष्ट्रातील एक प्रमुख जिल्हा आहे. नियमित कृषी बाजारपेठांचा अभ्यास करण्यासाठी महाराष्ट्रातील सातारा जिल्हयाची निवड पुढील घटकांचा अभ्यास करण्यासाठी केली आहे.

१) सातारा जिल्हयातील प्रदेशामध्ये नैसर्गिक एकजिन्सीपणाचा अभावा आहे.

२) सातारा जिल्हयाचा सामाजिक व आर्थिक विकास चालु असून त्या विकासाच्या पाठीशी शेती हा एक प्रमुख आर्थिक घटक महत्वाचा असुन तो अभ्यासला आहे.

३) अभ्यास क्षेत्रासाठी प्राकृतिक रचनेनुसार आणि वातावरणानुसार त्या प्रदेशाचा सामाजिक व

आर्थिक विकासावर परिणाम झालेला अभ्यासण्यासाठी निवड केली आहे.

अध्ययन विषयाची उदिष्टे :

१) सातारा जिल्हयातील बाजारपेठांवर परिणाम करणाऱ्या भौगोलिक घटकांचा अभ्यास करणे.

२) सातारा जिल्हयाती कृषी बाजार केंद्राचे वितरण व वितरणाची वैशिष्टये अभ्यासणे.

३) बाजारपेठोंच्या केंद्राचा आढावा घेणे.

४) बाजारकेंद्राशी संबंधित विविध सेवासुविधांचा अभ्यास करणे.

५) बाजार केंद्रातील कृषी उत्पादनाची विक्रि व आर्थिक उलाढाल यांचा अभ्यास करणे.

६) सातारा जिल्यातील बाजारपेठेचे कार्य व परिस्थितीचा अभ्यास करणे.

७) बाजारकेंद्रामुळे प्रादेशिक विकासातील योगदानाचा अभ्यास करणे.

माहिती संकलनाचे स्त्रोत व अभ्यास पध्दती :

माहिती संकलनाचे स्त्रोत

अ) प्राथमिक स्त्रोत :

सातारा जिल्हयातील कृषी नियमीत बाजारपेठांची प्राथमिक स्वरुपाची माहिती गोळा करणे. ही माहिती निरीक्षण व मुलाखती तसेच प्रश्नावली (Field work) च्या माध्यमातून गोळा केली आहे. सदरची माहिती सन २००५ ते २०१५ या कालावधीतील आहे. त्या जिल्हयातील सातारा, कराड, पाटण, वाई, फलटण, कोरेगांव, माण-खटाव आणि पाटण इत्यादी प्रमुख कृषी बाजारपेठा असून याबाबतचा अभ्यास करण्यात येणार आहे.

ब) दुय्यम स्त्रोत :

दुय्यम स्वरूपाची आकडेवारी प्रामुख्याने भारतीय जनगणना अहवाल, जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन, जिल्हा सेन्सस, प्रशासकिय कार्यालय (शेती विभाग, कृषी उत्पन्न बाजार समिती) तसेच प्रसिध्द विविध संस्थांचे प्रकाशित झालेले लेख व आकडेवारी आणि शासकिय प्रकाशने यांचा वापर करण्यात येणार आहे. तसेच सदय माहिती व आकडेवारी मिळविण्यासाठी संकेतस्थळांचाही वापर करण्यात आला आहे.

सदर संशोधन पूर्ण् करण्यासाठी सात प्रकरणे केली आहेत ती पुढीलप्रमाणे :

प्रकरण १ ले प्रस्तावना

प्रस्तुत प्रकरणात संशोधनाचा आराखडा संक्षिप्त स्वरुपात मांडण्यात आला आहे. यामध्ये संशोधन संकल्पनेचे महत्व, उदिष्ट, सांख्यिकिय आधार, संशोधन पध्दती व पुर्व साहित्याचा आढावा इत्यादी घटक विचारात घेण्यात आले आहेत.

प्रकरण २ रे अभ्यास विषयक प्रदेशाची भौगोलिक माहिती

जिल्हयाचा भौगोलिक विस्तार याविषयी माहिती दिली आहे. यामध्ये प्रामुख्याने अध्ययन प्रदेशातील आर्थिक व सांस्कृतिक घटकांची विस्ताराने माहिती देण्यात येणार आहे.

प्रकरण ३ रे कृषी आधारित नियमित बाजार केंद्राचे वितरण

या प्रकरणात सातारा जिल्हयातील नियमित कषी बाजारकेंद्राचे स्थान, वितरण व वर्गीकरण यांची माहिती असून त्या प्रदेशातील कृषी बाजारपेठेची केंद्रीकरण व केंद्राच्या वैशिष्टयसंबंधीचे वर्गीकरण करण्यात येणार आहे. नियमित कृषी आधारित बाजार केंद्राचे वितरण, बाजारकेंद्राचे सरासरी क्षेत्रानुसार गुणोत्तर, ग्रामीण वस्त्या व नियमित बाजारसंख्येचे गुणांत्तर, नियमित बाजारपेठव लोकसंख्येचे गुणोत्तर, कृषी नियमित बाजारपेठ केंद्रांची कृषीघनता यांचा अभ्यास करण्यात येणार आहे.

प्रकरण ४ थे नियमित कृषी बाजारपेठेचा सेवा प्रदेश व वाहतुक निर्गमन

अध्ययन प्रदेशातील कृषी बाजापेठेचा जिल्हा अंतर्गत सेवा प्रदेश आणि वाहतुकिच्या निर्गमनाचा अभ्यास केला आहे. नियमित कृषी बाजारकेंद्राचे अभिक्षेत्रीय वितरण, नियमित कृषीबाजारपेठ सेवा प्रदेश, कृषी नियमित बाजारपेठांचे तालुकानिहाय वितरण, कृषी नियमित बाजारपेठेचे आठवडा बाजारचे वितरण, कृषी नियमित बाजारपेठेतील वाहतुकीचे निर्गमन, कृषी नियमित बाजारपेठेतील पशुधन आवक, कृषी नियमित बाजारपेठेतील प्रमुख वस्तु व उत्पादनावर आधारित केंद्राचे वितरण या घटकांचा विचार केला आहे.

प्रकरण ५ वे अध्ययन प्रदेशातील नियमीत कृषी बाजारपेठांचे कार्य

अध्ययन प्रदेशातील नियमित कृषी बाजारपेठ केंद्रामधील बाजापेठेच्या आर्थिक कार्याचा अभ्यास केला आहे. तसेच कृषी बाजार केंद्रामधील ग्राहक उपयोगी मालाचे उपलब्धतेमध्येहोणारे बदल यांचा अभ्यास केला आहे. नियमीत कृषी बाजरपेठ समितीचे स्वरुप, डेव्हीस केंद्रीयता मोजण्याच्या पध्दती, खिस्टलच्या केंद्रीय ठिकाण सिध्दांत, जॅक्सनची सैध्दांतिक पध्दती, व्ही. एल. एस. प्रकाशराव यांची परवर्तीत पध्दत, एकत्रित विकासाचा निदे्रशांक यांचा अभ्यास केला जाणार आहे.

प्रकरण ६ वे अध्ययन नमुना निवड प्रदेश

अध्ययन प्रदेशातील नियमीत कृषी बाजारपेठ केंद्रामधील नमुना निवड बाजारपेठेत सातारा, कराड, फलटण, पाटण, वाई, माण, खटाव, कोरेगांव या तालुक्यांची निवड केलीअसुन तेथील नियमीत कृषी बाजारपेठेतील स्थापना, वस्त्यांचा समावेश बाजारातील कृषी मालाची आवक, सुविधा इ. सेवांचा अभ्यास यात केला आहे.

प्रकरण ७ वे निष्कर्श आणि उपाययोजना:

या प्रकरणामध्ये निषकर्ष आणि शिफारशी याबाबतची माहिती देण्यात येणार आहे.

संदर्भ

१. देशपाडे, सी.डी (१९४१) मुबई कर्नाटकाच्या बाजार केंद्राविषयी नियमीत यात्रा याब सहसंबंधात्मक अभ्यास केला आहे.

२. प्रा.इ.ओ. हेडी (१९६१) यांच्या शेतीतील आर्थीक उत्पादन व संसाधने प्रेटीस हॉल

३. श्रीवास्तव, आर.सी. आणि गुप्ता, जे,पी (१९७९) 'कानपुन शहाराच्या नियमीत बाजाराम्धील प्रवासी ग्राहकांची पदानुक्रम' यावर संशोधन केलेले आहे.

४. कैलासनाथ सिंग आणि सिंग लालदेवी (१९८५) 'यात्रा व्यापार स्थळांच्या लोकसंख्येच्या समाजिक व आर्थिक प्रारुप' याविषयी अध्ययन केले आहे.

५. ऐफरसन जे. नारसन (१९९४) "शेतीतील नियोजनाचे तत्वे " मॅक ग्रॉ हॉल

६. डॉ विठल घारापुर (२००२) आर्थिक भुगोल, पिंपळापुरे प्रकाशन नागपुर ४४०००२

७. A.K Das Gupta A.K(१९७३) : Agricultural and Economic Development in India associated.

८. A.K.M. Baual Rahman, (१९७९) : Report on the Rural Market survey in Bangladesh, Minstry of Agriculture and Forests, Republic of Bangladesh.

संशोधनार्थी

प्रा. मनोजा भास्कर सोनार
भूगोल विभाग,
रयत शिक्षण संस्थेचे कला व वाणिज्य
महाविद्यालय, पुसेगांव, जि. सातारा.

संशोधन मार्गदर्शक

प्रा. डॉ. बस्वराज नागलगावे
भूगोल विभाग,
पं. दिनदयाल महाविद्यालय,
देवणी, जि. लातूर